स्थापना दि. २२/०९/१९२०

॥ विना सहकार नही उद्धार ॥

रजि. नं. ३१०७

संस्थापक

## आपली बँक, कर्मचारी बँक



कै. माधवराव रामचंद्र देशपांडे

रिझर्व्ह बँक परवाना क्र. UBD.MUM(MAH) 0038/P2009-10 DATED 16.01.2010

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक

## NZSPKB

**प्रशासकीय कार्यालय :**

सोमा हाईटस्, दुसरा मजला, नविन आग्रा रोड, भाभानगर,
मुंबई नाका, नाशिक - ४२२ ०११.

☎ : ०२५३-२२१६१०३/१०४/१११

Website : www.karmacharibanknashik.in.

• E-mail : nzspksbk@gmail.com

• स्वागत कक्ष :०२५३-२२१६१००

**GST No. 27AAAAN1810E1Z5**

# १०३ व्या

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

*** प्रकाशक ***

बाळासाहेब गोविंद ठाकरेपाटील

अध्यक्ष

# १०३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक** या बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना स्नेहपूर्वक कळविण्यात येते की, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाची **''१०३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा'' रविवार दि. ०३/०९/२०२३ रोजी** सकाळी ११.०० वाजता **परशुराम सायखेडकर (प.सा)नाट्यगृह,** सार्वजनिक वाचनालय, नेहरु गार्डन, टिळकपथ, नाशिक येथे बँकेचे अध्यक्ष **मा.श्री. बाळासाहेब गोविंद ठाकरेपाटील** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस आवर्जून वेळेवर उपस्थित राहून उपकृत करावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय :-**

१. दिनांक २४/०९/२०२२ रोजी झालेल्या मागील **''वार्षिक सर्वसाधारण सभेचे''** इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२३-२०२८ साठी निवड झालेल्या **''संचालक मंडळाच्या''** निवडणूकीच्या निकालाची नोंद घेणे.

३. दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संपलेल्या वर्षाचा **''वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकांनी तपासलेली आर्थिक पत्रके, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक''** वाचुन त्यास मान्यता देणे, तसेच वार्षिक अंदाजपत्रकापेक्षा **जास्त** झालेल्या खर्चास मान्यता देणे.

४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२-२३ च्या **''नफा वाटणीस''** मंजूरी देणे.

५. मा. वैधानिक लेखापरीक्षक यांच्या सन २०२१-२२ च्या **''दोष दुरुस्ती''** अहवालास मान्यता देणे.

६. मा. वैधानिक लेखापरीक्षकांकडून प्राप्त झालेल्या सन २०२२-२३ या वर्षाच्या **''वैधानिक लेखापरीक्षण''** अहवालाचे वाचन करणे व केलेल्या सुचनांची नोंद घेणे.

७. सन २०२३-२४ चे मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वार्षिक **''अंदाजपत्रकास''** मंजूरी देणे.

८. संचालक मंडळ सभा दि. २६/०७/२०२३ चे ठराव क्र.१६ नुसार सन २०२३-२४ या वर्षाकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मान्यता दिलेल्या **लेखापरिक्षकाच्या नेमणूकीची नोंद घेणे** व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत मंजूरी देणे.

९. सन २०२४-२५ या वर्षासाठी **''अंतर्गत लेखापरीक्षकाची''** नेमणूक करणे व त्यांचा **मेहनताना ठरविणे** बाबत विचार करणे.

१०. सहकारी कायदा कलम ७५(२) (एक) अन्वये बँकेचे **''संचालक व त्यांचे निकटचे नातेवाईक''** यांचेकडील येणे कर्जाच्या तपशिलाची नोंद घेणे.

११. बँकेच्या मालेगांव, येवला व कळवण शाखेसाठी **''जागा / बांधीव मिळकत''** खरेदी करणेबाबत विचार करणे.

१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची **''अनुपस्थिती''** क्षमापित करणे.

१३. मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने **''ऐन वेळी''** येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

वार : शनिवार
दिनांक : १९/०८/२०२३

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
सही
**(सुरेश रतन पाटील)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सूचना :**

१. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येवून सभेचे कामकाज पूर्ण करण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.

२. सभासदांना सभेपुढील विषयापैकी काही माहीती हवी असल्यास अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी बँकेच्या कार्यालयीन वेळेत दिनांक २६/०८/२०२३ अगर तत्पुर्वी बँकेच्या कार्यालयात लेखी कळवाव्यात म्हणजे सदरची माहीती सभेच्या वेळेत पुरविली जाईल. दिनांक २६/०८/२०२३ नंतर व ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांबाबतची माहीती सभेच्या वेळेत पुरविली जाणार नाही. विहीत मुदतीत सभासदाने विचारलेल्या प्रश्नांची माहिती बँकेने लेखी कळविल्या वार्षिक सर्वसाधारण सभेवर त्यासंबंधी पुन्हा खुलासा दिला जाणार नाही.

३. बँकेचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल व वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस सोडुन बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात पहावयास मिळेल तसेच प्रत्येक कार्यालयात अहवालाच्या प्रती सभासदांच्या माहीतीस्त्व पाठविण्यात आलेल्या आहेत. ज्या सभासदांना अहवालाची प्रत हवी असेल ती त्यांना आपल्या बँकेच्या नजिकच्या शाखेतुन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

४. सभेत फक्त सभासदांनाच प्रवेश दिला जाईल.

## - गुणगौरव कार्यक्रमाविषयी -

आपल्या **नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेच्या** सर्व सन्माननीय सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपल्या बँकेचा गुणगौरव कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे बँकेच्या वर्धापनदिनी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येत असतो. यावर्षीचा आपला गुणगौरव कार्यक्रम **शुक्रवार २२ सप्टेंबर २०२३ रोजी रावसाहेब थोरात सभागृह**, मॅरेथॉन चौक, गंगापुर रोड, शिवाजी नगर, नाशिक या ठिकाणी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे .

आपणास विनंती की खालील निकष पात्र पाल्यांचा अर्ज शैक्षणिक प्रमाणपत्रासह आपल्या जवळच्या शाखेत सादर करण्यात यावा.

**निकष :**

१) इयत्ता दहावी किमान ७५% आणि इयत्ता बारावी किमान ७०% व त्यावरील गुण असणे आवश्यक आहे.

२) पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी (Post Graduation) या परीक्षेसाठी किमान ६०% गुण असणे आवश्यक आहे.

३) राज्य शासन पुरस्कार प्राप्त सभासद व

४) विशेष प्राविण्य प्राप्त पाल्य इ.

तरी सर्व सन्माननीय सभासदांनी आपल्या पाल्यांचे बँकेच्या विहित नमुण्यातील अर्ज प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतिसह कार्यालयीन वेळेत आपल्या जवळच्या शाखेत जमा करावेत, ही विनंती.

# सभासदांकरीता

# मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध




यासाठी आजच आपल्या
जवळच्या शाखेशी संपर्क करा.

**संपर्क नंबर**

- प्रशासकिय कार्यालय : ०२५३-२२१६११५
- रविवार कारंजा शाखा : ०२५३-२५०८३०५
- मालेगांव शाखा : ०२५५४-२५४२५५
- येवला शाखा : ०२५५९-२६५११५
- कळवण शाखा : ०२५९२-२२२४२२
- भाभानगर शाखा : ०२५३-२२१६११२

बुक–पोस्ट

प्रति,
मा.श्री./सौ. ____________________

____________________

____________________

प्रकाशक
बाळासाहेब गोविंद ठाकरेपाटील, अध्यक्ष

Unity Prints - 9422258989